# शुभ दिन

WWW.SHUBHDIN.NET

• वर्ष 04 • अंक 229

• पाने 8 • RNI No.: MAHMAR/2015/67630



जिल्हा प्रतिनिधी , नांदे

विशाल परशुराम पवार

८६९८९७७३१०


## देगलूर महाविद्यालयात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंती साजरी



**देगलूर/प्रतिनिधी** : जगाच्या इतिहासात महान कर्तृत्ववान आणि शौर्यवान स्त्रियांच्या यादीत असणाऱ्या , भारतातील अनेक प्राचीन मंदिराचा जीर्णोद्धार करून भारतीय संस्कृती जपणाऱ्या,प्रत्यक्ष युद्धभूमीवर कर्तृत्व दाखविणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई खंडेराव होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज देगलूर महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला.

स्वातंत्र्य, समता , बंधुता व सामाजिक न्याय या मानवी मूल्यावर आधारित राज्यकारभार त्यांनी केला. होळकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रमास अहत व्यापार शि.स्था.चे अध्यक्ष मा.प्रकाश पाटील, सचिव मा.शशिकांत चिद्रावार कोषाध्यक्ष मा.विलास तोटावार, कार्यकारी सदस्य मा.देवेंद्र मोतेवार, श्री रवींद्र ध्याडे,इंजिनीयर भरत अटकळीकर, प्राचार्य डॉ अनिल चिद्रावार , प्रा डॉ नरवाडे सर, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.